दहशतवाद आणि पाश्चिमात्य आक्रमकता

✻ लेखक ✻
प्रा. खुर्शीद अहमद

✻ भाषांतर ✻
प्रा. अब्दुर्रहमान शेख

"अल्लाहच्या नावाने जो असीम दयावंत व कृपावंत आहे."

दि. ११ सप्टेंबर २००१ हा अमेरिकेच्या इतिहासात काळा अतिदु:खद आणि अविस्मरणीय दिवस आहे. ज्या प्रकारे ७२ वर्षांपूर्वी १९२९ साली न्युयार्क शेअर बाजार पत्त्यासारखा गडगडला होता. नंतर १९४१ साली म्हणजे ६० वर्षांपूर्वी पर्ल हार्बरवर जापानचे अचानक आक्रमण झाले, त्यात सुमारे अडीच हजार अमेरिकी मारले गेले आणि अमेरिकी अर्थव्यवस्था, राजकारण आणि आंतरराष्ट्रीय नीतीमध्ये आमूलाग्र बदल झाले होते. त्याच प्रकारचे परिवर्तन अमेरिकी जीवनात ९/११ च्या त्रासदीनंतर झाले. या घटनेने फक्त अमेरिकेलाच नाही तर पाश्चात जगतालासुध्दा हलवून सोडले. शीतयुध्दानंतर पाश्चात्य, अमेरिका आणि भांडवलशाहीने स्वत: आपल्या तोंडाने आपल्या अध:पतनाचा ढोल बडवायला सुरुवात केली. इतिहासाचा अंत होण्याची शुभवार्ता दिली जात होती. हे सर्व वर्ल्ड ट्रेड सेंटरचे दोन्ही मनोरे जमीन दोस्त झाल्यानंतरच समाप्त झाले. अध्यक्ष बुश महाशयांनी या घटनेला एकवीसाव्या शतकातील पहिले युध्द व त्याची सुरवात म्हणून घोषित केले. पुढे हे उष्ण अथवा शीत युध्दाचे स्वरूप धारण न करो. सर्वांत मोठा धोका हा आहे की पाश्चात्य जगत आणि इस्लामी जगतामध्ये नवे क्रॉसयुध्द (क्रुसेड) सुरु होऊ नये.

एकशे दहा मजले असलेले हे वर्ल्ड ट्रेड सेंटरचे निर्माण २० वर्षांपूर्वी एक अब्ज डॉलर खर्च करून झाले होते. ११६ एकर जमिनीवर त्याचा पसारा होता. वर्ल्ड ट्रेड सेंटर इमारतीमुळे न्यूयार्क शहराची शान वाढली होती. या इमारतीत ५० हजार लोक काम करीत होते. या इमारतीचे वार्षिक भाडे तीन अब्ज डॉलरपेक्षा अधिक होते. अमेरिकेची ही इमारत आर्थिक सत्ताकेंद्र होती. अमेरिकेची सशक्त अर्थव्यवस्था व संपन्नतेचे ते प्रतीक होते. विश्वव्यापी भांडवलशाहीचे वैभवशाली प्रतिरूप म्हणजे वर्ल्ड ट्रेड सेंटर. वॉशिंग्टन शहरातील पेन्टागन (रक्षामंत्रालय) एक सुरक्षित जागा होती. येथे २४ हजार लोक काम करीत होते आणि ते अमेरिकेच्या सार्वभौमिक सैन्यशक्तीचे प्रतीक होते. हे दोन्ही भवन एका तासाच्या अल्पावधीत तीन अपहरित विमानांच्या टकरीमुळे भूईसपाट झाले. या दोन्ही इमारतींचा विध्वंस आणि हजारो लोकांचा मृत्यु ही घटना असामान्य त्रासदी होती. वर्तमानकाळातील महाशक्ती अमेरिका आपल्या सुरक्षेवर जगाच्या सुरक्षेच्या खर्चाच्या ३६ पट जास्त खर्च दरवर्षी करते. तिच्या अजित होण्याचा दावा जगासमोर फोल ठरला. काही वेळ अमेरिकी रक्षातंत्र आणि अमेरिकी सत्ता भयभीत झाली. २४ तास ही विश्वाची महाशक्ती जी आता डरकाळ्या फोडत आहे, वास्तविकपणे नेतृत्वहीन बनली होती. राष्ट्रपती, उपराष्ट्रपती आणि काँग्रेस स्पीकर सर्व हवेत उडून सुरक्षित ठिकाण शोधत होते तर

जमिनीखाली निर्मित सुरक्षित स्थळी शरण घेण्यास इच्छुक होते. सर्वजण जगाच्या धोक्यापासून आपला जीव वाचविण्याच्या काळजीत होते. याचे दुसरे उदाहरण या शताब्दीत सापडणे मुश्कील आहे. या दुर्घटनेनंतर अमेरिकी नेतृत्वाला ज्या परिस्थितीतून जावे लागले आणि नेतृत्वाचा चेहरा व घोषणांचा रंग पाहून त्यास विस्मय, आघात, अपमान, क्रोध, आवेश, प्रतिशोध व उन्मादच म्हणावे लागेल.

चितांजनक प्रवृत्ती

या दुर्घटनेला आता बराच कोळ झाला परंतु अमेरिका आणि पाश्चात्य जगतावर एक अशांतीपूर्ण दशा स्थापित झाली आहे. अनिश्चितता चहूकडे पसरलेली आहे. भावनात्मक स्थितीत काहीतरी करण्यासाठीची धोक्याची सूचना देत आहे. वडाचे तेल वांग्यावर या म्हणीनुसार अरब राष्ट्रांना आणि इस्लामी जगताला शिकार बनविले जात आहे. ओसामा बिन लादेनवर सर्व राग काढला जात आहे. अफगानिस्तानवर अमेरिका सूड उगवित आहे आणि त्या राष्ट्राला बेचिराख करत आहे. हत्तीने डासावर हल्ला केला आहे. सर्व राग व्यक्तीविशेषवर काढून आपली असफलता, घृणा आणि अविश्वास झाकण्याचा केविलवाणा प्रयत्न अमेरिका जगासमोर करीत आहे.

ही स्थिती अतिशय चिंताजनक आहे. शांतचित्ताने आणि विवेकबुध्दीने निर्णय घेणे तसेच सत्य आणि न्यायिक सिध्दान्तानुसार विश्लेषण होताना दिसत नाही. ज्याच्याकडे शक्ती आहे आणि जगाच्या नेतृत्वाचा भार ज्याच्या शीरावर आहे तो एका घायाळ हिंसक पशुसारखा वागत आहे. ज्या कुणावर व राष्ट्रावर त्याला संशय आला त्याला समूळ नष्ट करण्याची नीती अवलंबून युध्दाचा सपाटा लावला आहे. राष्ट्रपती बुश म्हणतात की हा आतंकवाद नाही तर युध्द आहे. युध्दाचे ठिकाण जगात कुठेही निवडण्याचा या 'दादा'ला स्वयंघोषित अधिकार आहे. एकामागून एक अरब राष्ट्राला शिकार बनविले जात आहे. पर्ल हार्बरच्या युध्दाच्या वेळी हल्लेखोर, परिचित होता आणि त्याचे ठिकाणसुध्दा माहीत होते. आजपर्यंत हे निश्चित झाले नाही की हल्लेखोर कोण आहे आणि तो कुठे आहे? संशयित वृत्तीला आणखी उत्तेजित करण्यासाठी 'सभ्यतेवर हल्ला' आणि त्याच्याविरुध्द युध्द म्हटले जात आहे. अशा प्रकारे जगाला दोन भागांत विभागले जात आहे. हा एक अतिघृणित प्रकार तथाकथित सुसंस्कृतांकडून होत आहे. एकीकडे पाश्चात्य देश आणि दुसरीकडे जगातील इतर देश असे चित्र उभे केले गेले आहे. सांगितले जात आहे की फक्त आतंकवादी लोकांना नष्ट केले जाईल जिथे त्यांना शरण दिले जाते. परंतु अमेरिका हेतुपुरस्सर हे विसरला आहे की त्याच्याच भूमीत आई.आर.ए.च्या आंतकवाद्यांना शरण दिले आहे. तसेच क्युबापासून लॅटीन अमेरिकेपर्यंतच्या डझनभर देशांतील

आतंकवादींना अमेरीकेत शरण देण्यात आले आहे. इराण, लिबीया, इराक या राष्टांत आतंकवादी कृत्ये करणारे अनेक सशस्त्र संघटनांसाठी अमेरिका शरणभूमी बनली आहे. सी.आय.ए. आणि इतर संघटना त्यांना प्रशिक्षण आणि हत्यार पुरवित आहेत. उपराष्ट्रपती डिक चेनी यांनी तर स्पष्ट केले आहे, "आतंकवादाला प्रोत्साहन देणाऱ्या राष्ट्रांना समूळ नष्ट करणे आमचा उद्देश आहे." बुध्दीजीवी, लेखक आणि मीडिया यांची एक मोठी फळी प्रतिशोध आणि राष्ट्रहिंसा करण्याचा प्रचार करीत आहे. पूर्व सेक्रेटरी ऑफ स्टेट लॉरेन्स ईगल बर्गर म्हणतात, "या प्रकारच्या लोकांपासून निपटण्याची सुरवात करण्याचा हा एक प्रकार आहे. तुम्हाला त्यांच्यातील काहींना ठार करावेच लागेल, मग त्यांचा संबंध तात्कालिक घटनेशी नसला तरी."

अमेरिकी विदेशनीतीचे पंडित आणि व्हिएतनाम, कम्बोडिया, चीली आणि अनेक राष्ट्रांमध्ये लाखो लोकांच्या नरसंहारासाठी जबाबदार हेन्री किसींजर म्हणतो, "जरी हे स्पष्ट नाही की ह्या कार्यवाहीत बीन लादेनचा हात होता किंवा नाही तरी दंडात्मक कार्यवाही आवश्यक आहे." मुख्य लक्ष त्या देशांविरुध्द कारवाई करणे आहे जिथे दहशतवादाचे नेटवर्क आहे. परंतु सरकारला सुसंगठित प्रतिक्रियेची जबाबदारी उचललीच पाहिजे. आशा केली पाहिजे हे तशाच प्रकारे संपेल जसा पर्ल हार्बरवरील हल्ला संपला होता. म्हणजे या दहशतवादी नेटवर्क (जाळे) ला नष्ट करून." *(वाशिंग्टन पोस्ट १२-११-२००१)*

हेन्री किसींजरने सल्ला दिला आहे की जर दुसरी राष्ट्रे अमेरिकेला साथ देतील तर ठीक, अन्यथा एकट्याने ही कार्यवाही करावी आणि सहमतीची प्रतिक्षा करू नये. ही तर मोठ्या बुध्दीजीवी आणि उत्तरदायी लोकांची वर्णनशैली आहे.

(१) वाशिंगटन पोस्टमध्ये रीचलोरी लिहीतो, "आम्ही जर दमास्कस किंवा तेहरान अथवा काहीही असो त्याचा एकभाग नष्ट करून टाकला तर हेसुध्दा समाधानकारक कृत्य म्हटले जाईल." *(१३ सप्टेंबर २००१)*

(२) न्युयार्क पोस्ट मध्ये स्टीव डिलीव्हरी लिहितो, "२१ व्या शतकाच्या या पर्ल हर्बरचे उत्तर तेवढेच सहज व जलद होणे आवश्यक आहे. हरामींना अविलंब ठार करा. डोळ्यांच्या मधोमध गोळी मारा. त्यांचे तुकडे तुकडे करा. जरूरी वाटल्यास विष द्या आणि शहर अथवा राष्ट्र जे या किड्यांना संरक्षण देत आहेत त्यांच्यावर बॉम्बहल्ले करा." *(१२ सप्टेंबर २००१)*

(३) न्युयॉर्क डेली न्युजमध्ये एक महिला ऐन कॉमिल्टर लिहिते, "आता वेळ नाही की या विशेष आतंकवादी हल्ल्यात सरळ पध्दतीने दोषींना हुडकून काढावे, तर आम्हाला त्यांच्या देशांवर हल्ले केलेच पाहिजेत. त्यांच्या नेत्यांना ठार केले पाहिजे.

आम्ही हिटलर आणि त्याच्या उच्च अधिकाऱ्यांचा ठावठिकाणा शोधतांना आणि त्यांना शिक्षा देताना औपचारिक नियम पाळले नाहीत. आम्ही जर्मन शहरांवर कारपेट बॉम्बहल्ले केले होते. आम्ही नागरिकांना ठार केले. ते युध्द होते आणि हेसुध्दा युध्द आहे." (१२-११-२००१)

अशा प्रकारची वातावरणनिर्मिती केली जात आहे आणि मुस्लिम व अरब यांच्या निशाण्यावर आहेत. राष्ट्रपती बुश यांनी क्रुसेड युध्द (धर्मयुध्द) हा शब्दप्रयोग करून आगीत तेल ओतण्याचे काम केले आहे. इस्लामला एक आतंकप्रिय धर्म आणि मुस्लिमांना आतंकप्रिय समुदायाच्या रूपात प्रस्तुत केले जात आहे. याचा परिणाम असा झाला की ब्रिटेन आणि अमेरिकेत शेकडोने अशा घटना घडल्या ज्यात मशिदी, मदरसे, मुस्लिम केंद्र, मुस्लिम परिवार आणि रस्त्याने चालणाऱ्या बुरखाधारी मुस्लिम स्त्रियांना लक्ष केले गेले. अमेरिकेत ३०० च्या वर प्रतिशोधात्मक घटना घडल्या आणि हा क्रम सुरुच आहे. हा किती मोठा अत्याचार आहे की मुस्लिम तर सोडा परंतु शिखांनासुध्दा त्यांच्या पोषाखावरून व दाढी पाहून ठार केले जात आहे. काय हीच ती सभ्यता आणि सर्वश्रेष्ठ जीवनव्यवस्था आहे? आंतकवादामुळे ही तथाकथित श्रेष्ठ सभ्यता आणि श्रेष्ठ जीवनव्यवस्था संकटात पडल्याची बोंबाबोंब आहे!

इस्लामी संघटनांची नीती

अमेरिका आणि पश्चिमात्य जगाची नीती कशीही असो आणि आपल्या भावना प्रकट करण्यासाठी ते कोणत्याही भाषेचा प्रयोग करीत असोत, परंतु एक मुस्लिम आणि मुस्लिम समुदायाच्या नात्याने आमची नीती आणि व्यवहार सत्यानुकूल, न्यायोचित आणि संतुलित असणे आवश्यक आहे. आपल्याला तर्कपूर्ण भाषा आणि सत्यनिष्ठता आचरणात आणणे आवश्यक आहे. कारण कुरआनचा आमच्यासाठी हाच आदेश आहे की तुम्ही जेव्हा लोकांशी व्यवहार कराल तेव्हा तो सत्याधिष्ठित असावा. कुरआन स्पष्टोक्ती आहे,

"मुस्लिमांनो! अल्लाह तुम्हाला आज्ञा देतो की ठेवी ठेवणाऱ्यांच्या स्वाधीन करा आणि जेव्हा लोकांदरम्यान न्यायनिवाडा कराल तेव्हा न्यायाने निवाडा करा. अल्लाह तुम्हाला उत्तम उपदेश देत आहे आणि निःसंशय अल्लाह सर्वकाही ऐकतो व पाहतो." *(४:५८)*

"अल्लाहने जी देणगी तुम्हाला प्रदान केली आहे, त्याची आठवण ठेवा आणि त्या दृढ वचनाला विसरू नका जे त्याने तुमच्याकडून घेतले आहे. म्हणजे तुमचे हे कथन की "आम्ही ऐकले व आज्ञाधारकता स्वीकारली. अल्लाहच्या कोपचे भय बाळगा. अल्लाह मनातील रहस्यदेखील जाणतो. हे श्रध्दावंतांनो, अल्लाहसाठी सत्यावर अढळ राहणारे व न्यायाची ग्वाही देणारे बना. एखाद्या गटाच्या शत्रुत्वाने तुम्हाला इतके प्रक्षोभित करू नये की तुम्ही न्यायापासून विमुख व्हाल. न्याय करा, हे ईशपराणतेशी अधिक निकटवर्ती आहे. अल्लाहच्या कोपचे भय बाळगून कार्य करीत राहा. जे काही तुम्ही करता अल्लाह त्याची पुरेपूर खबर ठेवणारा आहे. जे लोक श्रध्दा ठेवतील व सत्कृत्य करतील, अल्लाहने त्यांना वचन दिले आहे की त्यांच्या चुका माफ केल्या जातील व त्यांना मोठा मोबदला मिळेल. उरले ते लोक जो द्रोह करतील व अल्लाहची संकेतवचने खोटी ठरवतील, तर ते नरकात जाणारे आहेत." *(५:७-१०)*

मानवी जीवनाची सुरक्षा आणि सन्मान इस्लामची मूलभूत शिकवण आहे. या संदर्भात मुस्लिम व मुस्लिमेतर, स्त्री व पुरुष, मित्र व शत्रू असा भेदभाव नाही. सर्वांचे प्राण समान आहेत. अन्यायाने केलेली कोणाचीही हत्या ही अल्लाह आणि अल्लाहचे प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या आदेशाविरुध्द कृत्य आहे. अल्लाहचा आदेश आहे,

"ही तर आमची मेहरबानी आहे की आम्ही मानवजातीला मोठेपण दिले. (फक्त मुस्लिमांना किंवा विशेष जाती जमातींना नव्हे)" *(१७:७०)*

"कोणाची हत्या करू नका जिला अल्लाहने निषिध्द ठरविले आहे, परंतु सत्यानिशी." *(१७:३३)*

"ज्याने एखाद्या माणसाला खुनाबद्दल अथवा पृथ्वीतलावर उपद्रव पसरविण्याव्यतिरिक्त अन्य कारणाने ठार केले तर त्याने जणू काही सर्व मानवांना ठार केले. आणि ज्याने कोणाला जीवदान दिले त्याने जणू काही सर्व मानवजातीला जीवन प्रदान केले." (५:३२)

ज्या धर्माची शिकवण अशी आहे तो धर्म निष्पाप व निर्दोष व्यक्तींची आतंकवादी कृत्यांद्वारा अत्याचारपूर्ण हत्या करण्यास त्यांना कशी मान्यता देईल? याच कारणाने अमेरिकन आणि युरोपियन मुस्लिमांनीच फक्त नव्हे तर विश्वभरातील मुस्लिमांनी, मुस्लिम संघटनांनी व सर्व मुस्लिम शासनांनी ९/११ च्या आतंकवादी घटनेवर आणि त्यात मारले गेलेल्या हजारो लोकांच्या हत्येवर अश्रु ढाळले आहेत. या दु:खाला त्यांनी आपल्या अंत:करणातील खोलवर रुजलेले दु:ख समजून घेतले आणि या दु:खद घटनेची जाहीररीत्या भर्त्सना केली आहे. वास्तविक अपराध्यांना कठोर शिक्षा देण्याची मागणी त्यांनी केली. सर्व मुस्लिमांच्या दृष्टीने ही फक्त अमेरिकेपुरतीच क्षतीपूर्ण घटना नाही तर ही समस्त मानवतेची क्षती आहे. हे दु:ख केवळ एका राष्ट्राचेच नाही तर हे संपूर्ण मानवजातीचे दु:ख आणि पीडा आहे. ही क्षती आणि पीडा आमच्यासाठी (मुस्लिमांसाठी) तर आणखी जास्त आपलेपणाची ठरली कारण त्या 'वर्ल्ड ट्रेड सेंटर'मधील मृत्युमुखी पडलेल्या प्रत्येक पाच लोकांत एक मुस्लिम होता. पाच हजारपेक्षा जास्त निरनिराळ्या धर्मांचे लोक या आतंकवादी हल्ल्यात ठार झाले, त्यापैकी एक हजारापेक्षा जास्त मुस्लिम होते.

जगातील शंभरहून अधिक इस्लामी संघटनाप्रमुखांनी आणि मुस्लिम जगतातील विद्वान व विचारकांनी आपल्या एका संयुक्त घोषणापत्रात लगेच दि. १२ सप्टेंबरला या बरबरतापूर्ण हत्येची कठोर शब्दांत निंदा केली. दि. १८ सप्टेंबरला दुसऱ्या एका संयुक्त घोषणापत्रात इस्लाम आणि मुस्लिम समुदायाच्या स्पष्ट नीतीला जगापुढे मांडले. एकीकडे त्यांनी या आतंकवादी कृत्याची निंदा आणि निर्भर्त्सना केली, तर दुसरीकडे बदल्यासाठी निर्दोष लोकांच्या हत्यांविरुध्द सचेत केले आणि साहसपूर्ण व विवेकपूर्णतेने न्यायसंगत आणि संविधानिक कार्यवाहीच फक्त करण्याचा सल्ला दिला. खालील घोषणा संपूर्ण मुस्लिम जगताच्या भावनेचे द्योतक आहे.

"आम्ही न्यूयार्क आणि वॉशिंग्टनवरील कायरतापूर्ण आतंकवादी हल्ल्याची कडक शब्दांत निंदा करतो. ज्यामध्ये जगातील निरनिराळ्या देशांतील आणि धर्मांतील लोक मारले गेलेत. इस्लाम मनुष्यप्राणाची पवित्रता आणि पावनतेचा ध्वजवाहक आहे. कुरआननुसार एका निर्दोष व्यक्तीची हत्या करणे म्हणजे संपूर्ण मानवतेची हत्या करण्यासारखे आहे. हे कृत्य मानवतेविरुध्द अपराध आहे. जगभरातील मुस्लिम या भीषण आक्रमक कृत्यात झालेल्या जीवितहानीसाठी अत्यंत

शोकाकूल आहेत. कारण ही अमेरिका आणि जगाची संयुक्त क्षती आहे. आम्ही ही घोषणासुध्दा करतो की जगात कुठेही आतंकवादाचे शिकार होणारे लोकदेखील अशा सहानुभूतीचे, आपुलकीचे आणि चिंतानुभूतीचे पात्र आहेत. जे लोक मानवी समानतेचे ध्वजवाहक आहेत त्यांनी जगात पसरलेल्या आतंकवादाची निंदा केली पाहिजे आणि त्याविरुध्द लढले पाहिजे. आम्ही या सिध्दान्ताचे समर्थक आणि ध्वजवाहक आहोत की मानवाविरुध्द आतंकवादासाठी जे कोणी जबाबदार आहेत– व्यक्ती, समूह अथवा सरकार त्यांना कटघऱ्यात उभे केले गेले पाहिजे. अशा जघन्य अपराधींना कठोर शिक्षा विनाभेदभाव झाली पाहिजे. परंतु आतंकवादाच्या नावाखाली संदिग्ध व्यक्तीला त्याचा अपराध एखाद्या निष्पक्ष न्यायिक प्रक्रियेद्वारा सिध्द न होता एकतर्फी शिक्षा ठोठावणे हासुध्दा आतंकवादच आहे. या आतंकवादाला परवानगी नाही व त्यालासुध्दा सहन केले जाऊ शकत नाही.

न्यायाची, नैसर्गिकतेची आणि आंतरराष्ट्रीय कायद्याच्या सिध्दान्ताची कमीतकमी ही अपेक्षा आहे की अपराधाविरुध्द स्पष्ट पुरावा असावा. यासाठी आम्ही जगातील प्रत्येक राष्ट्राला आणि विशेषत: अमेरिका सरकारकडे अपील करतो की फक्त संशयावरून शक्तीचा एकतर्फी व मनमानी वापर त्यांनी करू नये. तसेच वकील, जज, वादीपक्ष आणि जल्लाद स्वत: बनू नये. आम्ही संयुक्त राष्ट्रसंघाचे महासचीव आणि सर्व मुस्लिम व युरोपियन राष्ट्रप्रमुखांशी जोरदार अपील करतो की विश्वाला अनुचित रक्तपात व हिंसेत लिप्त होण्यापासून आणि त्यात वृध्दीपासून वाचवावे. यामुळे जगातील देशादेशांत आणखी संघर्ष उफाळेल. आतंकवादाचा मुकाबला तर अशाच साधनांद्वारा केला जाऊ शकतो जे न्यायपूर्ण आणि न्यायसंगत आहेत. ती साधने जगात शांती स्थापित करणारी असतील. आम्हालासुध्दा या कार्यात मूकदर्शक बनून चालणार नाही, ज्या कार्यामुळे प्रतिशोध, उद्दामपणा आणि आंतरराष्ट्रीय दिवाळखोरीची दुर्गंधी येत असेल. या, पुढे या! आपण सर्वजण न्यायासाठी उभे राहू या आणि आतंकवादाचा मुकाबला करण्यासाठी संयुक्त कृती करू या. जगातून आतंकवादाला मूळासकट नष्ट करण्यासाठी आतंकवादाला कारणीभूत अन्याय, शोषण, अत्याचार, दहशतवादी नीती आणि प्रवृत्तींचा नाश करू या.''

ही आहे मुस्लिम समुदायाची सैध्दांतिक आणि वास्तविक स्पष्ट नीती. सर्व न्यायप्रिय शासनांचे व संघटनांचे कर्तव्य आहे की या गंभीर स्थितीत ईमानदारीने, विवेकशीलतेने व साहसाने आपल्या या स्पष्ट नीतीवर दृढ राहावे. केवळ, शक्तीसमोर दडपशाही व दहशतवादासमोर हत्यार टाकू नये. तसेच दुष्प्रचाराने प्रभावित होऊ नये. बदल्यासाठी प्रतिशोधसाठी अशा मार्गाचा अवलंब करू नये, जो सत्यापासून व यथार्थापासून दूरचा असेल.

अमेरिकी व्यवस्थेची लाजिरवाणी विफलता

आज सर्वांत महत्त्वाचा प्रश्न आहे की हे सर्व काही कसे घडले? आणि याचे खरे अपराधी कोण आहेत? गोष्ट फक्त संशय घेण्याची किंवा बदला घेण्याची नाही तर निष्पक्ष शोध आणि सत्याचा शोध घेणे आवश्यक आहे. दुर्भाग्याने सत्यापासून जगाचे लक्ष दुसरीकडे आकर्षित केले जात आहेत आणि सर्व मामल्यांना अशांतीपूर्ण रीतीने निपटण्याची खतरनाक चूक केली जात आहे. आश्चर्याची गोष्ट आहे की जगात आज कोणीही असा दिसत नाही की धैर्याने आणि हिमतीने बादशाहाला (अमेरिका) त्याच्या शरीराकडे पाहण्यास सांगेल की तो नग्न तर नाही ना?

आता हा शोध घेणे बाकी आहे की या अपराधाला घडविणारे कोण होते आणि त्यांचा मूळ उद्देश काय होता? पहिला प्रश्न आहे की अमेरिकन पोलीस, गुप्तचरयंत्रणा, राष्ट्रीय सुरक्षा यंत्रणा आणि शासन यंत्रणा या सर्वांचीच ही विफलता आहे. जबाबदार असणाऱ्यांची चौकशी का केली जात नाही? वरील सर्वयंत्रणा का विफल ठरल्या? त्यांना अमेरिकेत जाब विचारला जात नाही. साधी रेल्वे दुर्घटना झाली तर चौकशी समिती नेमण्याअगोदर रेल्वेखात्याच्या अधिकाऱ्यांना विचारणा होते आणि त्यांच्यावर उत्तरदायित्वाची जबाबदारी टाकली जाते. अमेरिकेची गुप्तचर प्रणाली जगातील सर्वांत मोठी आणि सर्वांत महागडी आहे. केवळ सी.आय.ए.चे वार्षिक बजेट ३० अब्ज डॉलर आहे. जगभरात या प्रणालीचे लाखाहून जास्त कर्मचारी विखुरलेले आहेत. एफ.बी.आय.च्या खांद्यावर आंतरिक सुरक्षेची जबाबदारी आहे, याचे वार्षिक बजेट तीन अब्ज डॉलर आहे. या प्रणालीचे अमेरिकेत ५५ केंद्र आणि २७ हजार ८०० कर्मचारी आहेत. या प्रणालीला चालविण्यासाठी देशाच्या पूर्ण बजेटचा पाचवा हिस्सा केवळ माहिती गोळा करण्यासाठी खर्च केला जातो. निगरानीसाठी अत्याधुनिक साधनसामुग्रीने सुसज्ज अशी ही प्रणाली आहे. तसेच आणखीन एक संस्था ज्यामध्ये २१ हजार कर्मचारी कार्यरत आहेत, त्या प्रणालीकडे विश्वातील सर्वोत्तम माहिती संकलन यंत्रणा आहे. या एजन्सीचे कर्मचारी जगातील मुख्य भाषांचे विशेषज्ञ आहेत. याव्यतिरिक्त नऊ आणखीन गुप्तचर संस्था आहेत ज्या सेना, वित्त, संचार, जल व विद्युत मंत्रालयांतर्गत काम करतात. या प्रत्येकाचे वार्षिक बजेट एक अब्ज डॉलर आहे. याव्यतिरिक्त आणखीन एक एजन्सी आहे, याचे वार्षिक बजेट दीड अब्ज डॉलर आहे. याचे एकमेव कार्य हे आहे की अमेरिकी भूमीवर जे काही घडते त्याचे चित्रण सुरक्षित केले जावे. अशा प्रकारे केवळ गुप्तचर संस्थावर वार्षिक खर्च ५० हजार डॉलर आहे. याव्यतिरिक्त सूचना व माहिती संकलन संस्थांवर २७ अब्ज डॉलर वार्षिक खर्च होतो. अशा प्रकारे गुप्तचर व

माहिती संकलनावर अमेरिकेत ७७ अब्ज डॉलर वार्षिक खर्च होतात.

(साप्ताहिक गार्डियन, २०-२६-९-२००१, पृष्ठ ५)

अशा स्थितीत माहिती आणि गुप्तहेरसाठीचे महाजाळे कार्यरत असतानासुध्दा १९ आत्मघातकी आतंकवाद्यांनी दोन वेगवेगळ्या विमानतळांवरून ही कार्यवाही सुरू केली होती. त्यांच्या बरोबरीने आणखीन तीन लोक सामील होते. ते सर्वजण अनेक महिन्यापासून या योजनेवर काम करीत होते. मोठ्या शहरात राहून कॅनडा व जर्मनीची यात्रा करीत होते. क्लबांमध्ये खाणे–पिणे, दारू पिणे, नाचगाण्यात ते भाग घेत होते. हेल्थ क्लबांत शरीर सदृढ बनवित होते. ते विमान उड्डानाचे रीतसर प्रशिक्षणसुध्दा घेत होते. अमेरिकी शासन इतकी मोठी रक्कम खर्च करून आणि अत्यंत आधुनिक व विकसित व्यवस्थेत राहूनसुध्दा त्यांना या कटाबद्दल काहीच कळू शकले नाही! म्हणून अशा स्थितीत या अत्यंत आधुनिक आणि विकसित गुप्तहेर व माहिती संकलन व्यवस्थेची चौकशी का केली जात नाही हे एक कोडे आहे. सी.आ.ए.च्या अध्यक्षाने राजीनामा दिला नाही की सी.बी.आय.च्या निदेशकाला बडतर्फ केले गेले नाही. ॲटर्नी जनरल जो या सर्वोच्च व्यवस्थेला जबाबदार आहे, त्यालासुध्दा काहीच झाले नाही! उलट ॲटर्नी जनरल साहेब छाती फुगवून छातीठोकपणे सांगत सुटले होते की आता न्यायाचा प्रश्नच उरत नाही, आता बदला घेण्याची आवश्यकता आहे. मुख्य असफलता अमेरिकी तंत्राची आहे. फक्त ओसामा बिन लादेन आणि अफगानिस्तानवर बॉंबवर्षाव करून अमेरिकी व्यवस्थेच्या विफलतेवर पडदा पडूच शकत नाही.

ही विफलता अशा वेळी आणखीच लाजिरवाणी होते जेव्हा आतंकवादाच्या धोक्याबद्दल सतत बोलले जात होते. हा धोका लोक जाणून होते. सन १९९३ मधील फेब्रुवारी महिन्यात याच वर्ल्ड ट्रेड सेंटरमध्ये बॉंबस्फोट झाला होता, ज्यात सहा लोक मारले गेले होते. सन १९९५ मधील एप्रिल महिन्यात ओक्ला हामाची घटना घडली होती, ज्याला जबाबदार एक अमेरिकी आतंकवादी रिमूथी लिकोन होता. या वेळी १६८ लोक मारले गेले होते. दोन महिन्यांच्या अगोदरच लिकॉनला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय दयेच्या अपीलच्या विपरीत फासावर लटकविले गेले. या आतंकवादी संघटनेकडून आतंकवादी हल्ल्याचा धोका होता. सन १९९८ मधील ऑगस्ट महिन्यात केनिया आणि टांझानियामध्ये अमेरिकी दूतावासात आतंकवादी हल्ल्यात २२४ लोक मारले गेले, त्या देशात त्याविरुध्द दावा दाखल केला गेला होता. ऑक्टोबर २००० मध्ये अमेरिकी जहाजावर घटना घडली, त्यात १७ लोक मारले गेले होते आणि त्याविषयीचा न्यायालयीन दावा चालू होता. याच वर्षात मार्चमध्ये सिनेटच्या गुप्तचर आयोगाने संभावित आतंकवादी हल्ल्याची पूर्वसूचना दिली होती.

हा अहवाल प्रकाशित झाला आहे. ११/९ च्या घटनेनंतर सी.आय.ए.ने त्या दोन संशायित व्यक्तींचे रेखाचित्र प्रकाशित केले होते. याविषयीची सूचना १७/९ ला, अशाच प्रकारची चेतावणी पुन्हा देण्यात आली होती. अशा या सर्व स्थितीत सर्व गुप्तहेर संस्था आणि एजन्सींची विफलताच उघड होते. परंतु याचा उल्लेख तर अमेरिकी अध्यक्षांच्या भाषणातसुध्दा आला नाही की प्रसारमाध्यमांच्या वाक्‌युध्दात!

ओसामा बिन लादेन

सर्व शक्ती एका व्यक्तीवर ओसामा बिन लादेनवर केंद्रित आहे. ओसामा बिन लादेन दहा वर्षांपासून परागंदा आणि निर्वासित जीवन जगत आहे. त्याच्याजवळ टेलिफोन नाही आणि बाहेरच्या जगाशी संबंध ठेवण्यासाठी कोणते साधनसुध्दा नाही. तो अशा देशात आहे ज्यावर वर्षानुवर्षे कडक नजर ठेवली जात आहे. त्याच्याकडे काहीच आधुनिक संचारप्रणाली नाही की इतर राजदूतीय किंवा आधुनिक तंत्रज्ञान नाही. त्याच्याकडे आंतरराष्ट्रीय मीडियाची सुविधा नाही की इंग्रजी भाषेत जगाला आपले म्हणणे सांगण्याची सुविधा उपलब्ध नाही. ओसामा बिन लादेन वर्षानुवर्षे प्रतिबंधित आहे आणि त्याची संपर्कप्रणाली प्रभावहीन आहे. त्याला कोणतीच बैकींग सुविधासुध्दा उपलब्ध नाही. तरीसुध्दा जगाला पटवून दिले जात आहे की तो अफगानिस्तानच्या एका गुहेत बसून हा सर्व तमाशा करीत आहे. ओसामा बिन लादनेच्या संपत्तीविषयीसुध्दा अनेक वावड्या उठविल्या जात आहेत. सत्य तर हे आहे की ज्या ३० कोटीच्या रकमेचा उल्लेख केला जातो ती रक्कम अमेरिकी गुप्तचर विभागावर खर्च होणारे ७७ अब्ज डॉलर आणि अमेरिकी रक्षा बजेटवर खर्च होणारे ३५० अरब डॉलर पुढे नगण्य मात्र आहे. ओसामा बिन लादेनला १२ वर्षांपूर्वी त्याच्या वडिलोपार्जित संपत्तीतून ८ कोटी रूपये मिळाले होते. त्यापैकी जी काही रक्कम त्याच्याकडे होती तीसुध्दा १९९६ सालात सौदी अरबची नागरिकता समाप्त झाल्यानंतर जगभरातील बँक खात्यांना सील केले गेले. यानंतर तो कुठेही संपत्ती ठेवू शकत नव्हता की बँक खाते उघडू शकत होता किंवा धंदा–व्यापार करू शकत नव्हता. काही कोटी डॉलर त्याच्याकडे असले तरी त्यांचा तो वापरसुध्दा करू शकत नव्हता. 'इकॉनॉमिस्ट' दैनिकाने आपल्या संपादकीयमध्ये लिहिले व मान्य केले की ओसामा बिन लादेनच्या संपत्तीविषयी फार काही अतिशयोक्ती करण्यात आली आहे. (२२/९/२००१, पृष्ठ १७) परंतु सत्य हे आहे की ओसामा बिन लादेन आणि त्याचे साथीदार अत्यंत बिकट आर्थिक स्थितीत सापडलेले आहेत.

पूर्व आफ्रिकेतील बॉम्बहल्यातील खटल्यात दिलेल्या एका साक्षीवरून शंका उत्पन्न होते. ओसामा बिन लादेनच्या एका साथीदाराने सांगितले की तो आर्थिक संकटात सापडला आहे. त्याने साक्ष दिली की त्याचे सर्व साथीदारसुध्दा आर्थिक

संकटात आहेत आणि त्यांच्यामध्ये नेहमी भांडणे होतात. याचा पूर्व लेखापाल जो अमेरिकेसाठी एक मोठा साक्षीदार आहे त्याने उधार देण्यास नकार दिला तर त्याला अलकायदा बाहेर काढले गेले.

आर्थिक स्थितीविषयी ही दशा आहे तर ओसामा बिन लादेनविरुध्द मोहीम आणि प्रचार म्हणजे चलाखी आहे. स्वयं अमेरिकी न्यायालयात लादेनविरुध्द जो खटला चालू आहे त्यात त्याच्याविरुध्द काहीएक सिध्द झालेले नाही.

'इकॉनॉमिस्ट' दैनिक आपल्या अग्रलेखात स्वीकार करते की, "सरकारी वकील हे सिध्द करू शकला नाही की मिस्टर बिन लादेनने हल्ला करण्याचा आदेश दिला होता."

हल्ले कोणी केले? ओसामा बिन लादेन आणि अफगानिस्तान अशा प्रकारचे संघटित, अत्यंत सुनियोजित आणि चहूमुखी कार्यवायी करू शकत नाही आणि एखाद्या अरब संघटनाद्वारे सुध्दा हे शक्य नाही. तर प्रश्न उठतो की हा भयानक हल्ला करणारा कोण असेल? अमेरिकी मीडिया आणि तेथील संघराज्ये लादेन व अन्य अरब संघटनांकडे संकेतसुध्दा करत नाहीत. आम्ही येथे ऐतिहासिक घटना आणि पुराव्यावरून तसेच वर्तमानकाळातील लक्षणावरून काही कल्पित अनुमानांकडे आपले लक्ष वेधणे जरूरीचे समजतो.

प्रथम संभावना आहे की अशा प्रकारची कार्यवाही एखाद्या संघटित अमेरिकी गुटाकडून झाली असावी जो गुट समाजद्रोही आणि शासनद्रोही तसेच शासन व्यवस्थेशी नाराज आहे. वर्तमानकाळात अशा प्रकारची अनेक उदाहरणे सापडतात ज्यामुळे या शंकेला बळ प्राप्त होते. देशात अपराधांची कमी तर मुळीच नाही. परंतु काही दिवसांपूर्वी शाळकरी मुलांना सुनियोजितपणे ठार केल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. त्यापैकी कॅलिफोर्नियामध्ये एकाच शाळेतील १२ मुलांना ठार करण्यात आले. टमूथी मेक्की याने ओक्लाहामामध्ये १२६८ लोकांची हत्या केली व न्यायालयात आणखीन लोकांना ठार करण्याची इच्छा व्यक्त केली. वर्ल्ड ट्रेड सेंटरची घटना टयुमथीला फाशी दिल्यानतर दोन महिन्यांच्या आत घडली आहे. ही आतंकवादी कारवाई टयुमथीच्या गुटातील लोकांनी घडविण्याची शक्यता आहे. आणखीन एक अमेरिकन आतंकवादी गट राष्ट्रपती बुश यांच्या गृहराज्यातील टेक्सासचा जॅको नामक आहे. ज्यांनी एका संपूर्ण लोकवस्तीला आग लावून भस्म केले. डेव्हिड कोरीस आणि त्याचे शिष्यसुध्दा विद्रोही गटातील आहेत, त्यांच्याकडून सुध्दा ही घटना घडली असावी.

विचार करण्यासारखे दुसरे कारण हे आहे की या हल्ल्यामुळे कोणाचा फायदा

झाला आहे. खुद्द अमेरिकेत अशी तत्त्वे आहेत जी राजकीय संस्थांवर आणि राजकीय विभागांवर स्वत:चे वर्चस्व स्थापित करू इच्छितात. ही तत्त्वे भाषणस्वातंत्र्य आणि शासनप्रणालीवर विभिन्न प्रकारची बंधने लावू इच्छितात. त्यांना असे काही करावयाचे आहे की ज्यामुळे लोकशाहीस्वातंत्र्याला लगाम लावला जाईल. त्यांना देशावरील आपली पकड मजबूत करावयाची आहे. त्यात संरक्षण विभागसुध्दा त्यांच्या डोळ्यांसमोर आहे. देशाच्या लष्कराची आणि औद्योगिक गटाचीसुध्दा यात भूमिका असणे आपण नाकारू शकत नाही.

वरील संशयाला माहिती आणि सूचनांमुळे अधिक पुष्टी मिळत आहे. या घटनेनंतर पूर्ण स्टॉक एक्सचेंजच्या असाधारण स्थितीमुळे धक्कादायक माहिती पुढे येत आहे. लंडनचे दैनिक समाचार पत्र 'इंडिपीडंट'चा संवाददाता म्हणतो की ६ सप्टेंबरला (ध्यानात असू द्या की ८ व ९ सप्टेंबर रोजी शनिवार व रविवार या दोन दिवशी सुटी होती) अमेरिकेच्या या दोन्ही विमान कंपन्यांच्या शेअर्सच्या विक्रीने उच्चांक गाठला होता. ज्या कंपन्यांचे विमान या दुर्घटनेसाठी वापरले गेले होते, त्यांच्या शेअर्सची किंमत दुर्घटनेनंतर अचानक एकदम खाली आली. त्या वेळी या घटनांकडे लक्ष न देता त्यांची उपेक्षाच केली गेली. परंतु आता प्रश्न निर्माण झाला की हे घडले कसे? एका दिवसात युनायटेड एअरलाईन्समध्ये २००० समझोते झाले जे त्यापूर्वीच्या कारोबारापेक्षा २८५ पटीने जास्त आहेत. त्या दिवशी त्याच्या शेअरची किंमत ३० डॉलर होती. परंतु दुर्घटनेच्या दुसऱ्या दिवशी मात्र ती १८ डॉलर झाली. अमेरिकी एयरलाईनच्या शेअर्सची विक्री घटनेअगोदर ६० पटीने जास्त होती. अशाच प्रकारे वर्ल्ड ट्रेड सेंटरमध्ये काम करणाऱ्या दोन आंतरराष्ट्रीय कंपन्या 'मोरगन स्टेनली' आणि 'मार्श ॲन्ड मेकलेनन' यांचे शेअरर्सची विक्री घटनेपूर्वी २५ ते १०० टक्के जास्त झाली होती.

भांडवली गुंतवणुकीचा विशेषज्ञ जॉन नाजारेन (Jon-Nagarian) दुर्घटनेपूर्वीच्या शेअर्स बाजारातील असाधारण विक्रीबद्दल आश्चर्य व्यक्त करताना म्हणतो की, ''जेव्हा आम्ही असे असामान्य सौदे होताना पाहतो तेव्हा समजून घेतो की काहीतरी घडणार आहे.'' *(इंडिपेंडेन्ट, २० सप्टेंबर २००१)*

यावरून हेच स्पष्ट होते की काही तत्त्वांना काही तरी घडणार आहे याची कल्पना होती आणि यामुळे त्यांनी कोट्यवधी डॉलरची कमाई केली. परंतु या भयानक दुर्घटनेमुळे सर्वांत जास्त लाभ इस्त्राईलला झाला आहे. या घटनेला इस्त्राईलने पॅलेस्टीनी लोकांविरुध्द अमेरिकन राग भडकविण्यासाठी, स्वत:च्या अपराधांवर पडदा टाकण्यासाठी आणि तथाकथित शांती प्रक्रियेला खीळ घालण्यासाठी प्रयोगात आणले. दुर्घटनेच्या अर्धातासाच्या आत हेन्री किसींजरने ओसामा बिन लादेनचे नाव

घेतले आणि पूर्ण नेटवर्कला समाप्त करण्याची घोषणा केली. दुर्घटनेनंतर त्वरित इस्त्राईली पंतप्रधान एरियल शेरॉन यांनी म्हटले की ''अराफात आमचा लादेन आहे.'' आणि अराफातशी आपली निर्धारित भेट रद्द केली.

इंडिपेंडन्टचा प्रतिनिधी जेरूशलेमहून लिहितो की, ''इस्त्राईल अमेरिकेच्या या त्रासदीला पॅलिस्टीनी विवादात आपला राजकीय लाभ उठविण्यासाठी प्रयोगात आणत आहे. शेरॉन आणि त्याचे साथी अराफातची तुलना ओसामा बिन लादेनशी करत आहेत. अमेरिकन दुर्घटनेने पॅलिस्टीनला अगदी वेगळे पाडले आहे. पाश्चिमात्यांच्या जवळ त्यांच्यासाठी जी काही सहानुभूती होती तीसुध्दा नष्ट झाली आहे.'' *(१६ सप्टेंबर २००१)*

हेसुध्दा एक आश्चर्य आहे की इंटरनॅशनल हेरॉल्ड ट्रिब्युनने वर्ल्ड ट्रेड सेंटरमध्ये ज्या ४६ देशांचे नागरिक मारले गेल्याचा समाचार दिला त्यात एकसुध्दा इस्त्राईली नागरिक नाही. न्युयार्कमध्ये यहुदी लोकांची संख्या अधिक आहे आणि वर्ल्ड ट्रेड सेंटरविषयी सांगितले जाते की त्यात ४००० हून जास्त यहुदी लोक काम करीत होते. परंतु मेलेल्यांपैकी एकही यहुदी माणसाचा उल्लेख अद्याप झालेला नाही, ५/६ यहुदी लोकांना अटक झाल्याची बातमी होती परंतु त्याला त्वरित दाबले गेले.

कॅनडाच्या 'स्ट्रेन इन्टेल'नुसार अमेरिकी सैनिकी गुप्तचर विभागानुसार या घटनेत इस्त्राईली (यहुदी) गुप्तचर संस्था 'मौसाद'चा हात आहे. ईरानचे सर्वोच्च धार्मिक नेता खोमेनी यांनी आपल्या शोकसंदेशमध्ये म्हटले आहे की, ''याचा पुरावा आहे की अमेरिकेच्या मोठ्या शहरातील दुर्घटनेत यहुदी (इस्त्राईल) लोकांचा हात आहे.'' (तेहरान टाइम्स, १९ सप्टेंबर २००१)

इस्त्राईल (यहुदी) लोकांच्या आंदोलनावर ऐतिहासिक दृष्टी टाकल्यास इस्त्राईली गुप्तहेर संस्था 'मौसाद'च्या भूमिकेविषयी संशय बळावतो. द्वितीय युध्दाच्या वेळी यहुदी आतंकवाद्यांनी स्वयं यहुदी प्रवाशांनी भरलेले जहाज यासाठी पाण्यात बुडवून टाकले होते की ब्रिटीश सरकारने त्या अवैध यहुदी प्रवाशांना पॅलेस्टाईनमध्ये प्रवेश करण्यास आज्ञा दिली नव्हती. यहुदींनी अशा प्रकारे आंतरराष्ट्रीय जनमत तयार करण्यासाठी खुनी नाटक केले. बैतुल मुकद्दसमध्ये प्रिन्स एडवर्ड होटल उध्वस्त करणे ही सुध्दा तीच चाल होती. सन १९६७ मधील युध्दापूर्वी अमेरिकी नाविकसेनेचे एक जहाज 'युएसएस लिबर्टी'ला इस्त्राईलने मिसाईलने उडवून दिले होते कारण त्या जहाजाने इस्त्राईलच्या इजिप्तवरील संभावित हल्यासंबंधीच्या तयारीला पाहिले होते. या पार्श्वभूमीवर आणि राजनीतिक फायद्यासाठी अरब देशांना पाश्चिमात्य देशांच्या नजरेत घृणित आणि बदला घेण्यास योग्य ठरविण्यासाठी इस्त्राईल खालची पातळी

गाठतो, हे सिध्द झाले आहे. यावरून ९/११ च्या आतंकवादी हल्यात इस्त्राईली गुप्तचर संस्था 'मोसाद'चा हात असण्याची दाट शक्यता आहे. अशा प्रकारच्या कारवाईसाठीची क्षमता या संस्थेकडे आहे. अशा प्रकारचे नाटक रशियामध्ये चेचेन्याविरुध्दच्या कारवायीपूर्वी मास्को आणि वल्गाडोन्सक शहरात १३ सप्टेंबर १९९९ रोजी दोन इमारतीत बॉम्बस्फोट केले गेले, ज्यात ३०० व्यक्ती मारल्या गेल्या. या घटनेला आधार बनवून चेचेन्यावर हल्ला करण्यात आला होता.

'इंडिपेन्डन्ट'चा स्तंभलेखक पैट्रीक कूकबर्न न्युयार्क आणि वाशिगंटनमध्ये घडलेल्या आतंकवादी कार्यवाहीच्या पार्श्वभूमीवर मास्कोच्या जनतेचे मत व्यक्त करताना म्हणतो, "१० पैकी फक्त एकाला विश्वास होता की हे चेचेन्याचे काम आहे. सुरवातीला आम्हाला वाटले हे चेचेन्याने केले आहे. आता आम्हाला कळून चुकले आहे की क्रेम्लीनच्या लोकांनी सत्तेमध्ये राहाण्यासाठी हे सर्व काही केले आहे."

ही आहे मेक्यावलीची राजनैतिक घटनाशैली. न्युयार्क आणि वाशिंगटनमध्ये जे घडलेल्याचे रहस्य एक न एक दिवस जगापुढे उघडे होईलच. आताच लक्षण दिसू लागले आहेत की पडद्यामागचा बोलवता धनी वेगळाच आहे.

ज्या लोकांवर विमान अपहरण करण्याचा आरोप आहे त्या लोकांविषयी जे विरोधाभासपूर्ण तथ्ये पुढे येत आहेत त्यावरून या घटनेची संदिग्धता आणखी वाढतच आहे. सांगितले जाते की ते अल कायदाचे सदस्य होते. त्यांच्या मद्यपानाचे, मौजमस्तीचे आणि नाचगाण्याचे, स्त्रीलंपटपणाचे वर्णनसुध्दा केले गेले आहे. एकीकडे धर्म आणि जिहादच्या गोष्टी तर दुसरीकडे जीवनाचा चंगळवाद आहे. काय ह्यात अनुकूलता आहे? स्पष्ट आहे की थापा मारून लोकांना चुकीची माहिती देणाऱ्या या महाभागांना इस्लामी शिष्टाचार, इस्लामी जिहाद आणि शहादत (हौतात्म्य) याविषयीचे अज्ञान आहे. ज्या १९ व्यक्तींची नावे घोषित झाली त्यात एक ख्रिस्ती आहे. काय ख्रिस्तीसुध्दा जिहाद आणि शहादतचा अभिलाषी होता? त्यातील पाच लोकांविषयी स्पष्ट झाले आहे की ते जीवंत आहेत. ते सर्व सौदी अरेबिया आणि मोरोक्को देशात स्थायिक आहेत. त्यांचा विमान अपहरणाशी काही एक संबंध नाही. त्यांच्यातील तिघांनी तर अमेरिकी प्रसारमाध्यमाविरुध्द मानहानीचा दावा करण्याचे मन बनविले आहे. यावरून हेच स्पष्ट होते की जी नावे दिली जात आहेत ती सर्व खोटी आहेत आणि खऱ्या अपराधींचा कुणालाच पत्ता लागत नाही.

हेसुध्दा लक्षात ठेवण्याजोगे आहे की ओक्लाहामाच्या त्रासदीच्या वेळी अरबांवर दोषारोप केले होते आणि त्यांच्याविरुध्द राष्ट्रीय स्तरावर मोहीम राबविली

होती. योगायोगाने टमुथीमेक्की पकडला गेला आणि तेव्हा स्पष्ट झाले की हे सर्व एका अमेरिकी आतंकवादीचे कृत्य होते. न्यायालयीन खटल्याच्या वेळी सत्य पुढे आले की त्याच्या गटात पाचशे लोक होते. परंतु तो गट अत्यंत संघटित होता. टमुथीबरोबर ज्या दोन व्यक्ती पकडल्या गेल्या त्यांच्यावर टमूथीने काही दोषारोप होऊ दिले नाही आणि त्यांना परिस्थितीजन्य पुरावे असूनसुध्दा दोषमुक्त ठरविले गेले. न्यायालयासमोरील टमूथीची साक्ष फार महत्त्वाची आहे. त्याने त्या आंतकवादी कृत्याला स्वत: घडवून आणले हे फक्त कबूलच केले नाही तर त्याला सत्यानुकूल सिध्द केले. त्याने स्पष्ट शब्दांत सांगितले की तो अमेरिकेला सचेत करू इच्छित होता आणि अधिकाधिक लोकांना ठार करण्याचा त्याचा मानस होता. त्याने अंतिम समयीसुध्दा माफी मागितली नाही. परंतु आपल्या मृत्युसमयी जी कविता वाचली त्यात आपल्या कार्यावर गर्व प्रकट केला. टमूथी आपल्या गटात एकटाच नव्हता. त्याच्या गटात सेकडो सदस्य होते. असे अनेक आतंकवादी गट अमेरिकेत कार्यरत आहेत.

अकरा सप्टेंबरचा आतंकवादी हल्ला सुनियोजितपणे आणि उच्च क्षमतेसह तसेच पारस्परिक सामंजस्याने पार पाडला गेला, तो हल्ला एखाद्या विदेशी गटाचा असू शकतच नाही. अशा प्रकारची कार्यवाही तेव्हाच संभव आहे जेव्हा अमेरिकी अत्यंत प्रशिक्षित, सक्षम आणि पूर्ण रहस्यांना जाणणारे त्यात सामील आहेत. त्यांनी अरब लोकांचा उपयोग ढालीसारखा केला. प्रशासन आणि प्रसारमाध्यमांनी ओसामा बिन लादेन आणि अफगानिस्तानला बळीचा बकरा बनविला आणि आपल्या विफलतेवर पडदा टाकण्याचा केविलवाना प्रयत्न चालू केला आहे. खऱ्या अपराध्यांपर्यंत पोहचण्याऐवजी त्यांच्याकडे डोळे मिटून बसले आहेत.

हे एक अपराधिक कृत्य आणि इस्लामी जगाविरुध्द स्पष्ट आक्रमकतेसारखे कृत्य आहे. एक सैध्दान्तिक गोष्ट म्हणजे कोणत्याही आरोपीवर जोपर्यंत आरोप सिध्द होत नाही त्यापूर्वी संशयावरून कार्यवाही करणे स्पष्ट अत्याचार आणि उपद्रव आहे. हे कृत्य दहशतवादी कृत्य आहे. आज अमेरिका शक्तीच्या बळावर आणि सामर्थ्याच्या नशेत गुंग होऊन केवळ संशयाच्या आधारावर फक्त व्यक्तीलाच नव्हे तर परधर्मियांना आणि परराष्ट्रांना समूळ नष्ट करण्याची व त्यांना पाषाणयुगात ढकलण्याची धमकी देत आहे. आज अमेरिका जगाचा दादा बनला आहे. कायदेकानूची भाषा बोलणाऱ्यांना, न्यायाची भाषा बोलणाऱ्यांना आणि बुध्दीविवेकाची भाषा बोलणाऱ्यांना अमेरिका शिव्या शाप देत आहे आणि दहशत दाखवित आहे. हे निसर्ग नियमाविरुध्द आणि मानवतेसाठी अस्वीकारणीय आहे. एका कवीनुसार,

वही क़ातिल वही शाहिद वही मुंसिफ ठहरा
अक़रबा मेरे करे खून का दावा किसपर

(अर्थात तोच हत्या करणारा व तोच साक्षीदार आणि तोच न्यायाधीशसुध्दा आहे. माझे संबंधित गण माझ्या हत्येचा दावा तरी कुणावर करणार?)

आतंकवादी कोण? अमेरिका आणि पाश्चिमात्य देशांनी विचार केला पाहिजे की ज्यांना ते आतंकवाद म्हणतात आणि त्याच्या उन्मूलंनासाठी एकविसाव्या शतकातील विश्वव्यापी युध्दासाठी कंबर कसून आहेत या प्रश्नाची वास्तविकता काय आहे आणि त्याची उकल कशी आहे?

आतंकवादाला कोणत्याही स्थितीत थारा दिला जाऊ शकत नाही. आतंकवाद अत्यंत निन्दनीय कृत्य आहे आणि त्याचा जितका विरोध केला जाईल तितका थोडाच आहे. राजनैतिक फायद्यासाठी हा मार्ग अवलंबून शेवटी निर्दोष माणसं मारली जातात. हे अक्षम्य अपराध आहे. या अक्षम्य अपराधांपासून लोकांना दूर ठेवणे मानवतेची सेवा आहे आणि त्या नादानाप्रति शुभचितंन आहे जे परिस्थितीपुढे नतमस्तक होऊन जाणतेपणाने अशी अमानवी कृत्ये करतात. परंतु येथे विचार करण्यासारखी गोष्ट आहे की वैध मार्गाने व प्रामाणिकपणाने परिस्थितीला सुधारण्याऐवजी केवळ शक्तीबळाच्या व सैन्यबळाच्या हट्धर्मीपणाने, पक्षपात, अभिमान, स्वार्थवृत्ती तसेच आर्थिक फायद्यापोटी आणि क्षेत्रिय व वैश्विक श्रेष्ठता प्राप्त करण्यासारख्या घृणित उद्देश्यांपोटी मानवी अधिकारांना पायदळी तुडविणे कशाचे लक्षण आहे? सुधारणेसाठी योग्य आणि वैधमार्गांना कायमचे बंद करून ठेवले गेले आहे. दुसऱ्यांना मानवी अधिकारांपासून व मानवी हक्कांपासून वंचित ठेवून सुधारणेच्या शक्यतेलाच समाप्त केल्याने त्याचे स्वाभाविक परिणाम आणि स्वाभाविक प्रतिक्रिया प्रकट होणारच. अशा स्थितीत उचित मार्गाबरोबर अनुचित मार्गाचासुध्दा अवलंब केला जातो. हे ऐतिहासिक सत्य आहे की अत्याचार आणि अन्यायी स्थितीत अत्याचार व अन्यायाची कारणमीमांसा न करता व्यक्तीला, समाजाला अथवा राष्ट्राला हिंसात्मक मार्ग अवलंबण्यास भाग पाडले जाते. अशा स्थितीत सुधार न होता बिघाड होतच राहातो. अमेरिका आणि भांडवलशाहीविरुध्द जगात एक प्रकारची घृणा आणि उदासिनता पसरलेली आहे. म्हणून केवळ सैन्यबळावर आतंकवाद नष्ट होणे असंभव आहे.

ब्रिटिश सांसद जॉर्ज गेलर यांनी संसदेत आपल्या भाषणात म्हटले होते ते अगदी योग्य आहे, ''तुम्ही एका ओसामा बिनलादेनला ठार कराल तर एक हजार लादेन तयार होतील.''

खरा प्रश्न आतंकवादाचे मूळ कारण शोधून काढणे आणि त्यात सुधार करणे अत्यावश्यक आहे. आज अमेरिका आणि युरोपसह जगातील अनेक क्षेत्रांत विद्रोही व असंतुष्टांचे बंड होत आहेत. वंचित आणि उत्पीडित लोक जीवावर उदार झालेले आहेत. आतंकवादाविरुध्द बॉम्ब, मिसाईल वापरून लोकांच्या वस्त्यांना आणि शहरांना बेचिराख करून लढले जाऊ शकत नाही. आतंकवादाविरुध्दचे युध्द तर तसे युध्द आहे जे गरीबी, भूख, रोगराई आणि अज्ञानता विरुध्द लढले जाते. हे युध्द क्रोध व बळाने नव्हे तर अत्यंत समजदारीने आणि योग्य उपायांनी लढले जाते. मानवी समस्यांची उकल करण्यासाठी योग्य मार्ग सोडून केवळ सैन्य बळानेच लोकांना दाबण्याचा प्रयत्न झाला तेव्हा ते सर्व प्रयत्न विफल ठरले हा इतिहास आहे. उग्रवादाला, दहशतवादाला आणि अत्याचाराला खतपाणी घालण्यासाठी सर्वश्रेष्ठ मार्ग हाच आहे की बदला घेण्याच्या नशेत जनआंदोलनांना बळपूर्वक पायदळी तुडवावे.

जगात साम्यवादाने दोन शतके हे युध्द लढले परंतु त्यांना शेवटी स्वातंत्र्य आंदोलनाशी समझोताच करावा लागला आणि कालचे आतंकवादी आजचे राजनैतिक नेता आणि शासक बनून बसले. अमेरिका हा अनुभव व्हिएटनाम, चिली आणि कंबोडिया या देशापासून घेऊन बसला आहे. रशियाने अफगानिस्तानमध्ये हाच खेळ खेळला होता तरी त्याने त्यापासून धडा घेतला नाही. तो आज चेचेन्यात त्याच मूर्खपणाची पुनरावृत्ती करत आहे. इंग्लंडने जगभरातून परास्त झाल्यानंतरसुध्दा आयरलंडमध्ये वीस वर्षांपर्यंत सैनिकी युध्द केले आणि शेवटी त्याच 'सिनफेन'शी करार केला ज्याचे नाव रेडिओ, टीव्हीवर घेणे निषिध्द होते. इस्त्राईल पॅलेस्टाइनमध्ये हाच खेळ खेळत आहे. विश्वातील काही देश विभिन्न क्षेत्रांत राजनैतिक समस्यांची उकल सैन्य बळावर करण्याच्या असफल प्रयत्नात मग्न आहेत. समस्यांचे समाधान फक्त आणि फक्त शांती भंग करणारी तत्त्वे आणि कारणांवर शांत दिलाने विचार होणे आवश्यक आहे. आतंकवादाकडे नेणाऱ्या कारणांना यामुळे समूळ नष्ट केले जाईल. आतंकवादी कारवायांपासून मानवजातीला मुक्ती देण्यासाठी याव्यतिरिक्त दुसरा मार्ग नाही.

आत्ममंथनाची गरज

पाश्चिमात्य देशातसुध्दा ज्या लोकांची दृष्टी जीवनाच्या तथ्यांवर आणि इतिहासाच्या संदेशाकडे आहे त्यांनी हीच गोष्ट सांगितली आहे.

दैनिक इंडिपेंडेटचा प्रसिध्द राजनैतिक समीक्षक रॉबर्ट फिस्क (Rubest Fisk) या घटनेच्या पार्श्वभूमीवर मध्यपूर्वेच्या त्रासदीच्या संदर्भात ज्या विचारांना व्यक्त करीत

आहे ते फक्त अमेरिकी नेतृत्वासाठीच नव्हे तर विश्वभरातील शासकांचे डोळे उघडणारे आहे. ''आता गोष्ट तर इथपर्यंत आली आहे की मध्यपूर्वेचा संपूर्ण आधुनिक इतिहास, उस्मानी साम्राज्याचे पतन, बाल्फुरची घोषणा, लॉरेन्स ऑफ अरेबियाची खोटी घटना, अरबविद्रोह, इस्त्राईली राष्ट्राची स्थापना, अरब राष्ट्रे आणि इस्त्राईलमधील चार युध्दे आणि अरबांच्या भूमीवर इस्त्राईलचे अत्याचारपूर्ण ३४ वर्षे कब्जा सर्वकाही तासात नष्ट झाले. अत्याचारित व अपमानित लोकांचे प्रतिनिधित्व करण्याचा दावा करणाऱ्यांनी भयानक क्रुरतेने आणि चालाखीने पलटून आक्रमण केले. हे कृत्य तेच करतात जे वास्तवत: विनाशाची चव चाखून आहेत. काय हे उचित आणि नीतिसंगत आचरण आहे? ज्याविषयी इतक्या लवकर लिहिले जावे त्याविषयी काही पुरावा नाही की साक्ष नाही. अत्याचारपूर्ण घटना जी ओक्लाहामा मध्ये घडली ती तर अमेरिकेत लहानाचे मोठे झालेले अमेरिकी लोकांचेच कृत्य होते. मला पूर्ण संशय आहे की आतासुध्दा हेच आहे व अमेरिका युध्दाच्या स्थितीत आहे. मी जर चूक करत नसेल तर मध्यपूर्वेतसुध्दा अनेक हजार लोक मारले जातील आणि अमेरिकेतसुध्दा. आमच्यापैकी काही लोक 'येणारा विनाश'पासून सावधान करीत आलोत. आम्ही अशा भयानक स्वप्नाच्याविषयी विचारसुध्दा केला नव्हता. परंतु हे आतंकवाद आणि लोकशाहीचे युध्द नाही ज्याचा विश्वास लोकांना करून दिला जाईल. हे अमेरिकी मिसाईलविषयीसुध्दा आहे जे पॅलेस्टाईनींच्या घरावर पडतात. त्या घटनांविषयीसुध्दा आहे जेव्हा अमेरिकी हेलिकॉप्टरांनी १९९६ साली लेबानानी ॲम्बुलन्सवर मिसाईलचा हल्ला करून काही दिवसानंतर त्वरित 'काना' नामक शहरावर बॉम्बहल्ले केले. अमेरिकेचा सहयोगी इस्त्राईल द्वारा पुरस्कृत सैन्याने शरणार्थी वस्त्यांवर हल्ले करून लुटमार केली, हत्या केल्या आणि बलात्कार केले. आता तर अजिबात संशय नाही की अमेरिकेत जे काही घडले ते असे उपद्रव आहे ज्याचे वर्णन करणे अशक्य आहे. २० ते ३५ हजार निर्दोष लोकांच्या हत्येवर पॅलेस्टाईन जनतेने आनंदोत्सव करणे त्यांच्या निरासेचेच फक्त द्योतक नाही तर त्यांच्या राजनैतिक अपरिपक्वतेची साक्ष देते. हे यासाठी की ते आपला शत्रू इस्त्राईलवर अशाच प्रकारचे आरोप लावतात.

परंतु आम्हाला सुचित केले गेले होते. अनेक वर्ष जोरदार भाषणे अमेरिकेच्या हृदयावर हल्ले करण्याचा संकल्प, 'अमेरिकी सापाचा फना चिरडण्याची घोषणा, आम्ही या सर्वांकडे पोकळ घोषणा म्हणून दुर्लक्ष केले. रूढीवादी, अविकसित, अलोकतंत्रीय आणि भ्रष्ट शासन व्यवस्था आणि लहानसे उत्तेजित गट या प्रकारचे आधारहीन संकल्पना कशा प्रकारे पूर्ण करू शकतात हे माहीत झाले आहे. या

विनाशाच्या काही तासानंतरच मी अमेरिका आणि त्याच्या सहयोगींवर होणाऱ्या हल्ल्याविषयी विचार करू लागले. या घटनेपुढे पूर्वी होऊन गेलेल्या घटना तुच्छ आणि साधारण वाटू लागल्या. २३ ऑक्टोबर १९८३ साली आत्मघाती बॉम्बहल्ल्यात २४१ अमेरिकी कर्मचारी आणि १०० फ्रान्सीसी सेना ठार झाली. त्यावेळेपर्यंत या दृष्यासारखे भीषण उदाहरण दुसरे नव्हते. नौसेनेवर हल्ला आणि फ्रान्सीसीवर हल्ला यात फक्त सात सेकंडचेच अंतर होते. यानंतर सऊदी अरबमध्ये अमेरिकी अड्ड्यांवर हल्ले झाले. मागील वर्षी ओमानमध्ये अमेरिकी नौसैनिक जहाजाला जलसमाधी देण्यात आली. आम्ही मध्यपूर्वेचे नवीन हत्यार निराश परंतु जीवावर उदार आत्मघातकी बॉम्बहल्लेखोरांना ओळखण्यास पूर्ण असफल ठरलो. या आत्मघातकी पथकाची बरोबरी अमेरिका किंवा इतर युरोपिय देश करू शकणार नाहीत. अरब सांगतील की अमेरिकेची संपूर्ण शक्ती, धन आणि दंभसुध्दा जगाच्या सर्वश्रेष्ठ शक्तीला विनाशापासून वाचवू शकले नाहीत.

अनिवार्य आणि स्वाभाविकपणे आता अगदी स्पष्ट अनैतिकतापूर्ण नीती स्वीकारून मागील ऐतिहासिक चुका, अन्याय, अत्याचार आणि हिंसेवर पडदा टाकण्याचा पुरेपूर प्रयत्न केला जाईल. या ऐतिहासिक घटना ९/११ च्या घटनेच्या पृष्ठपोषक आहेत. आम्हाला दाखविले जाईल की हे निरुद्देश आतंकवाद आहे. याला निरुद्देश म्हणणे अत्यंत आवश्यक आहे. आम्ही सत्याला जाणून घेण्यास योग्य नसलो की तीन महान धर्मांच्या धरतीवर अमेरिकेची अत्यंत घृणा केली जाते. म्हणून निरुद्देश म्हणणे आवश्यक आहे. एका अरब नागरिकाकडून माहिती करून घ्या की तो २०/३० हजार निर्दोष व्यक्तीला ठार करण्याला कसा समजतो. तो अरब पुरुष असो की स्त्री, सभ्य आणि विवेकशील नागरिकाप्रमाणे तो या कृत्याला असहनीय अपराध म्हणेल. तो अरब हे आवश्य जाणून घेईल की आम्ही असे शब्द आणि घृणा त्यावेळेस का दर्शविली नाही जेव्हा अमेरिका पुरस्कृत प्रतिबंधामुळे इराकमध्ये ५ लाख मुलांना आपले प्राण गमवावे लागले. जेव्हा लेबेनानवर इस्त्राईलने १९८२ साली आक्रमण करून १७५०० लोकांना ठार केले. आम्ही (अमेरिकेने) मध्यपूर्वेतील राष्ट्र इस्त्राईलला हा अधिकार का म्हणून दिला की संयुक्त राष्ट्र संघाच्या सुरक्षा परिषदेच्या प्रस्तावांची तो उपेक्षा करतो! इतर राष्ट्र जे त्या प्रस्तावांची उपेक्षा करतात त्यांच्यावर मात्र संयुक्त राष्ट्र संघामार्फत अमेरिका प्रतिबंध लादतो. (हा कुठला न्याय?) आम्हाला पाहावे लागेल की मागील सप्टेंबरमध्ये पूर्वेत जो भडका उडाला होता त्याचे काय कारण होते? अरब क्षेत्रांवर इस्त्राईलचा बळपूर्वक आणि अत्याचारपूर्ण कब्जा, पॅलेस्टाईन लोकांना त्यांच्याच मातृभूमीतून हाकलून देणे,

इस्त्राईलचा अमानुष अत्याचार राज्य पुरस्कृत आतंकवाद इ. सर्व घटनांना डोळ्यांपुढे ठेवूनच या घटनेची कारणमीमांसा करावी लागेल. अमानुष अत्याचार आणि नरसंहार करूनसुध्दा इस्त्राईलवर दोष ठेवण्याची कुणाचीही हिंमत नाही. आम्ही विश्वास करू की सद्दाम हुसेनसारखे मूर्ख याचा दावा करतील. परंतु इतिहासातील या दुर्घटना आणि त्यातील आमच्या (पक्षपाती) भूमिकेला पुढे ठेवून आत्मघातकी हातकंड्यांची कारण मींमासा करू या. आपण दिलेल्या वचनाला न जागणे याचा परिणाम उस्मानी साम्राज्याचा विनाशात झाला. इस्त्राईलच्या सैन्यदलाचा पूर्ण खर्च अमेरिका देत आहे. आता पुढे हे चालणार नाही. ही कार्यवाही असामान्य धाडस आणि नियोजनाचे धोतक आहे. आता वेळ येऊन ठेपली आहे की अमेरिकेने एका क्षणासाठी थांबून विश्वातील आपल्या चरित्रावर, अरबांच्यावर झालेले अत्याचारांवर, अमेरिकी शासनाची संवेदनहीनता आणि वर्तमान राष्ट्रपतीची निष्क्रियता या सर्वांवर गंभीर विचार होणे आवश्यक आहे.

नि:संदेह अमेरिकेला वाटते की 'विश्वव्यापी आतंकवाद'विरुध्द कारवाई करावी. याला कोण दोष देणार? 'आतंकवाद'च्या उत्तेजनापूर्ण आणि वंशवादी शब्दप्रयोगावर कोण अमेरिकेला दोषी ठरवणार? आतंकवादाच्या ऐतिहासिक कारणांवर विचार करण्याच्या प्रस्तावाला रद्द त्वरित केले जाईल. असे होत राहिले तर जग अशा घोर संघर्षाला सामोरे जाईल जे हिटलरच्या मृत्यूनंतर आणि जपानच्या पराजयानंतर जगाने पाहिले नाही कोरिया आणि व्हिएटनामचे उदाहरण तर आजच्या दृष्टीने नगण्य आहे.

आठ वर्षांपूर्वी टी.व्ही.वर मी एक मालिका सादर केली होती आणि हे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला होताकी मुस्लिमांची इतकी मोठी संख्या पाश्चात्यांशी घृणा का करते? रात्रीच मला ते मुस्लिम व त्यांची घरं डोळ्यापुढे आली ज्यांना अमेरिकेने बॉम्ब आणि मिसाईलनी नष्ट केले. ते म्हणत होते, ''अल्लाहशिवाय कोणीही आमच्या मदतीला नाही. धर्म तंत्रज्ञानाविरुध्द आज उभा आहे. आत्मघातकी बॉम्बवर्षाव परमाणुशक्तीविरुध्द संघर्षरत आहे.'' (डेली इंडिपेन्डंट)

'वाशिंगटन पोस्ट'मध्ये एक अमेरिकी प्राध्यापक रॉबर्ट जी केवयान (Robert G. Kavian) यांनी स्पष्ट शब्दांत आत्ममंथन करण्याचे आवाहन केले आहे. 'गार्डियन' साप्ताहिकाने एक समीक्षा प्रसिध्द केली आहे ती आत्ममंथन करण्यास वाचकाला भाग पाडते. *(२०-२६ सप्टेंबर २००१, पृष्ठ ३०)*

''आमच्या राजकारणी मंडळीपैकी एकानेही या महत्त्वाच्या प्रश्नाकडे लक्ष दिलेले नाही. देश आपल्या समानतेत मग्न आहे. बाहेरील जगाच्या अप्रिय घटनेची

आम्ही उपेक्षा करतो परंतु आमच्या शक्तीची सीमा आणि योग्यता काय आहे याची प्रचिती आम्हाला आता झाली आहे. यासाठी आम्हाला फार कष्ट झेलावे लागले आहे. आम्ही जगाचे पथदर्शक शक्ती आहोत. परंतु आम्ही फारच कमी जगाचे पथप्रदर्शन करतो. आम्ही पथप्रदर्शन करतो तेव्हा तेसुध्दा सैनिकी परिस्थितीत जसे कोसोवा आणि खाडीचे युध्द. वर्तमानकाळात कोणती गंभीर समस्या आहे जिचे समाधान अमेरिकेच्या नेतृत्वाखाली झाले आहे? जगातील गरीबांना आम्ही दुसऱ्या औद्योगिक प्रगत राष्ट्रपेक्षा फार कमी मदत देतो. अनेक सामूहिक समस्यांच्या सोडवणुकीसाठी सामूहिक प्रयत्नाच्या वेळी आम्ही वेगळे राहातो. उदा. बारूदी सुरूंगावर प्रतिबंध तसेच परमाणु परीक्षण तसेच वातावरण सुरक्षा इ. इ.

महाशक्ती ज्या सामाजिक वातावरणात ते काम करतात त्याची चिंता करणे आवश्यक आहे. सामाजिक वातावरणाचा शत्रू एखाद्या संसाधनसंपन्न शत्रूसारखा महाशक्तीखालील जमीन प्रभावीपणे धसवू शकतो. अमेरिकी लोकांनी समजून घेतले पाहिजे की त्यांच्याविरुध्द वातावरण तापत आहे. उदा. आम्हाला याची जाणीव आहे की निर्धनतेमुळे निर्माण होणारे रोग नष्ट झाले. तरी आज तेच आमच्या देशात प्रतिशोधात्मक रीतीने आक्रमण करत आहे. एडस महामारीसुध्दा एक विपत्तीचे लक्षण आहे. आम्हाला माहीत आहे की जगातील वंचित लोक श्रीमंत देशात अवैध मार्गाने जीव धोक्यात घालून प्रवेश करतात. आम्हाला माहीत आहे की मादक द्रव्याच्या व्यापाराला समाप्त करण्यासाठी आम्ही यशस्वी ठरत आहोत.

आज जग जवळ आले आहे व जग खेडे बनले आहे. आधुनिक विश्वव्यवस्थेचे हे वैशिष्ट्य आहे. जगाच्या खेड्यात (Global Village) गरीबाला जाणीव आहे की तो किती गरीब आहे आणि श्रीमंत किती ऐश आरामात आहे. साधनसामुग्री बाळगणारे गरीब आपल्या स्थितीला बदलण्याचा प्रयत्न करतात. लाखो लोक अमेरिकेत श्रीमंत होण्यासाठी येतात जसे हे आतंकवादी आले होते. परंतु ते एका वेगळ्या विचाराचे असतात जे अत्याचाराला सहन करू शकत नाही?

('साप्ताहिक गार्डियन', २०-२६ सप्टेंबर, २००१)

वरील 'गार्डियन'ची समीक्षा पाश्चात्य जगाला आत्मचिंतन करण्यास भाग पाडते.

वास्तविकतेचा स्वीकार करण्याची आवश्यकता - अमेरिकी आणि युरोपियन नेतृत्व जोपर्यंत खालील वास्तवतेला स्वीकारत नाही तोपर्यंत उपद्रव आणि विनाशाला नष्ट करण्याचा दुसरा मार्ग नाही.

१) आतंकवाद एक लक्षण आहे, एक चिन्ह आहे. जोपर्यंत त्याच्या कारणांना

विचारात घेतले जात नाही तोपर्यंत अशी कारणे आतंकवादाला जन्म देतात त्या कारणांचे निवारण होणे आवश्यक आहे. अन्यथा आतंकवाद थांबू शकत नाही.

२) आतंकवाद एक स्थळ अधारित घटनेचे नाव नाही, अत्याचार कुठेही होवो तो मानवतेसाठी धोका आहे. केवळ वाशिंगटन आणि न्युयार्कमध्येच निष्पापांचे रक्त सांडले गेले नाही तर जगात चहुकडे रक्त वाहत आहे. मानवात भेदभाव करणे स्वत: आतंकवादाला खतपानी घालणे आहे.

३) आतंकवाद आपल्या प्रत्येक रूपात निंदनीय आहे. मग आतंकित करणारा व्यक्ती, व्यक्तीसमूह अथवा शासन असो.

४) हिंसेला हिंसेने उत्तर देता येत नाही. तसेच तर्काचे स्थान आडंबर घेऊ शकत नाही. सुधारमार्ग कठीण आहे तसेच जोखमीचेसुध्दा आहे. परंतु याव्यतिरिक्त दुसरा मार्ग नाही.

५.) स्थितीला सुधारण्याची सर्वांनी एकत्र येऊन तयार झाले पाहिजे. जे सत्तेत आहेत आणि शक्ती आणि सामर्थ्य राखून आहेत, तेसुध्दा जे अत्याचारित, पीडित आणि पराधीन आहेत. हेच वंचित लोक आपल्या अधिकाराला प्राप्त करण्यासाठी संघर्ष करत राहतात.

परंतु सुधारकार्य शस्त्र श्रीमंत वर्गावर अधिक अवलंबून आहे. हे तत्त्व त्यांनी समजून घेतलेच पाहिजे. यातच सर्वांचे भले आहे.

*** समाप्त ***